“जिल्हा उद्योग केंद्राच्या अंतर्गत अनुदान व कर्ज प्राप्त सुशिक्षित बेरोजगार युवकांचा समाजशास्त्रीय अभ्यास (विशेष संदर्भ : लातूर जिल्हा)”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड सामाजिकशास्त्रे विद्याशाखेतंर्गत
समाजशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवीकरिता सादर केलेला

संशोधन आराखडा

: संशोधक :

पाटील सुलक्षणा भारत

समाजशास्त्र विभाग

श्री हावगीस्वामी महाविद्यालय,उदगीर जि.लातूर

: मार्गदर्शक :

प्रा.डॉ.कांबळे बी.एम.

सहयोगी प्राध्यापक

समाजशास्त्र विभागप्रमुख

यशवंत महाविद्यालय, नांदेड

मे २०१७

“जिल्हा उद्योग केंद्राच्या अंतर्गत अनुदान व कर्ज प्राप्त सुशिक्षित बेरोजगार युवकांचा समाजशास्त्रीय अभ्यास (विशेष संदर्भ : लातूर जिल्हा)”

प्रस्तावना :-

अन्न, वस्त्र, निवारा या मानवाच्या मूलभूत गरजा मानवाच्या उत्क्रांतीपासूनच आहेत. या गरजा भागविण्यासाठी मानव सातत्याने प्रयत्न करीत असतो. त्याची गरजा भागवण्याची आणि समस्या सोडविण्याची क्रिया अनंत काळापासून सुरू आहे. सुरुवातीला मानव निसर्गाधीन जीवन जगत असे. निसर्गातील वेगवेगळ्या घडामोडीचा शोध घेण्याचा प्रयत्न त्याने केला. त्यातून स्वतःच्या गरजा भागविण्यासाठी प्रयत्न करत असे. नंतर त्याने आपल्या कार्यासाठी आवश्यक असे छोटे-मोठे शोध लावले. त्याला आवश्यक असणाऱ्या वस्तूंची निर्मिती केली. पशूपालन, शेतीचा शोध लावला. दगड, माती, लाकडाचा वापर करून वेगवेगळी अवजारे व साहित्याची निर्मिती केली व त्यावर आधारित स्वतःच्या गरजा भागविण्याचा प्रयत्न केला. लोकसंख्या मर्यादित असल्यामुळे त्यावेळी नैसर्गिक साधनाच्या आधारे लोकांच्या गरजा भागवणे शक्य होते. परंतु वाढत्या लोकसंख्येला परंपरागत साधनांच्या आणि उद्योगाच्या आधारे गरजा भागविण्यासाठी समस्या निर्माण होऊ लागल्या. वाढत्या लोकसंख्येबरोबरच गरजा वाढत गेल्या. त्याप्रमाणे मानवाने नवनवीन शोध लावले. वाढत्या गरजा भागविण्यासाठी समाजव्यवस्थेत नवीन शोध लावत असताना पारंपरिक गरजा भागवण्याच्या पद्धतीतही बदल घडवून आणले गेले. शेती करण्याच्या अवजार साधनांपासून बदल घडवून आणला जातो आहे. अगोदरच्या कालखंडात जी साधने व तंत्रे वापरून व्यवसाय व उद्योग केला जातो. त्यांना आज आपण कुटीर उद्योग असे म्हणतो. मानवाच्या गरजा भागविण्यासाठी मानवाने ज्या वेगवेगळ्या व्यवस्था निर्माण केल्या त्यात वेगवेगळे शोध लावले. यात वाफेच्या इंजिनाचा शोध लावला व यानंतर यंत्रयुगाची सुरुवात झाली. १७ व्या शतकानंतर तर औद्योगिक क्रांतीची सुरुवात झाली. त्यानंतर जागतिक स्तरावर समाजव्यवस्थेने सामाजिक आर्थिक विकास होण्यास प्रारंभ झाला. लोकांच्या गरजा वाढल्या समस्या निर्माण झाल्या आणि या सर्वांवर मात करण्यासाठी नवनवीन तंत्र व यंत्र साधनांचे शोध लागत गेले. आर्थिक विकास साध्य करण्यास बहुतेक देशांना यश

प्राप्त झाले. लोकांच्या राहणीमानात सुधारणा झाल्या. औद्योगिकीकरणातून देशाच्या विकासाला चालना मिळते हे लक्षात आल्यामुळे उद्योगधंद्याच्या विकासाला महत्त्व प्राप्त झाले. आज बहुतांश देशाच्या विकासाचे मुख्य कारण औद्योगिक धोरण हेच राहिले आहे. यामुळे औद्योगिक विकासाला चालना मिळाली आहे.

उद्योगधंद्याचे चार प्रकार पडतात. कुटीर उद्योग, लघू, मध्यम व मोठे उद्योग. यातून औद्योगिक विकास साध्य करता येतो. उद्योगातून प्राप्त होणाऱ्या आर्थिक फायद्यातून लोकांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावत आहे. यातून आपोआपच सामाजिक विकास साध्य होतो. अशा उद्योग क्षेत्रात सर्वाधिक वाटा युवकांचा आहे कारण उद्योग हे क्षेत्र धाडसाचे आहे.

डायमण्ड यांच्या मते, "उद्योजकांना म्हणजे नवीन आर्थिक क्रिया सुरु करण्यामध्ये अनुस्यूत असलेली जोखीम स्वीकारण्याची तयारी यामुळे अपरिहार्यपणे ह्या क्रिया विशेष महत्त्वाच्या नसल्या तरी उद्योजकतेमध्ये नेहमी जोखीम स्वीकारणे व निर्णय घेणे ह्या क्रियाचा समावेश होतो." जोखीम स्वीकारणे आणि निर्णय घेणे धाडसाचे कार्य प्रभावीपणे युवा वर्ग करत असताना दिसून येतो. उद्योग ही क्रिया आर्थिक धाडसाची असल्यामुळे यात युवकांचा सहभाग अधिक आहे. कारण युवा अवस्थेतच निर्णय घेणे, जोखीम स्वीकारण्याच्या क्रिया होत असतात.

"भारतीय लोकसंख्येचा विचार करता २०११ च्या जनगणनेनुसार भारतात जवळपास २५ ते ३० टक्के लोकसंख्या युवकांची आहे, जी देशाच्या विकासात योगदान देऊ शकते." उद्योगाचे आर्थिक गुंतवणुकीच्या आधारे प्रकार पडतात. कुटीर उद्योग, लघू उद्योग, मध्यम उद्योग व मोठे उद्योग याशिवाय मानवी सहभाग, कच्च्या मालाचे प्रमाण, वस्तूची गरज, यंत्रसामुग्री इ. च्या आधारे उद्योग ठरवला जातो. त्यानुसार आवश्यक गुंतवणूक करण्यात येते व त्याआधारे नफा प्राप्त करण्यात येतो.

भारतात ब्रिटिशांच्या आगमनानंतर सामाजिक परिवर्तनाला सुरूवात झाली. ब्रिटिशांनी काही विकासाची धोरणे भारतातही राबवली. यात रेल्वे सेवा, विमान, जलवाहतूक, कारखानदारी निर्माण केली. यामुळे भारतात औद्योगिक विकासाला सुरुवात झाली. सुरूवातीला भारतीयांची औद्योगिक विकासाची गती अतिशय मंद होती परंतु आजची स्थिती मात्र एकदम उलट आहे. जागतिक स्तरावरील सर्वेक्षणानुसार एकूण उद्योजकीय क्षेत्रामध्ये ४०

टक्के लोक हे भारतीय आहेत. भारतीय स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय औद्योगिक विकासाला जास्त गती प्राप्त झाली. त्यातूनही लातूर जिल्ह्याचा औद्योगिक विकास उस्मानाबाद जिल्ह्यापासून विभाजित झाल्यापासून सुरू झाला. १५ ऑगस्ट १९८२ रोजी जिल्हा विभागणी होऊन १९८३ मध्ये जिल्हा उद्योग केंद्राची स्थापना करण्यात आली. ज्याच्या अंतर्गत उद्योगाच्या संदर्भात वेगवेगळ्या योजना शासन राबवते. सुशिक्षित बेरोजगारांसाठी स्वयंरोजगार योजना शासन राबवत आहे. सद्यस्थितीत उद्योग केंद्राकडे नोंदणीकृत २००० उद्योग सुरू आहेत. ज्यामध्ये १०१६ कोटींची गुंतवणूक करण्यात आली असून ३३६३९ लोकांना रोजगार उपलब्ध होत आहे.[३] याशिवाय जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यामध्ये औद्योगिक क्षेत्र निर्माण करण्यात आले आहे. शासनाच्या वतीने उद्योगासाठी आवश्यक सुविधा पुरवण्याबरोबरच प्रशिक्षण, नोंदणी, पतपुरवठा मिळवून देण्यास उद्योजकांना मदत करण्यात येते. याशिवाय केंद्र व राज्य शासनाकडून आवश्यक मदत मिळवण्यास प्रयत्न केले जातात.

संशोधनाची उद्दिष्ट्ये :-

१) उद्योग सुरू केलेल्या युवकांचा वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक बाजूचा अभ्यास करणे.

२) लातूर जिल्ह्यातील लघुउद्योगाच्या सद्यस्थितीचा अभ्यास करणे.

३) उद्योग चालवताना युवकांना उद्योग चालवण्यासाठी अनुदान देणाऱ्या संस्थांचा अभ्यास करणे.

४) युवकांना उद्योगाकरिता प्रेरित करण्याकरिता जिल्हा उद्योग केंद्राची भूमिका तपासणे.

५) जिल्हा उद्योग केंद्राच्या अनुदान प्राप्तीमुळे बेरोजगार युवकांमध्ये झालेला सामाजिक, आर्थिक परिवर्तनाचा शोध घेणे.

६) सुशिक्षित बेरोजगार युवकांना उद्योग चालविताना येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे.

गृहितकृत्ये :-

१) युवकांनी उद्योग सुरू केल्यामुळे त्यांची स्थिती सुधारली आहे.

२) लघु उद्योग सुरू करताना युवकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

३) लघु उद्योग सुरू व्हावे यासाठी जिल्हा लघु उद्योग केंद्र सुशिक्षित बेरोजगारांना प्रोत्साहित करते.

४) जिल्हा उद्योग केंद्रामुळे जिल्ह्याचा आर्थिक व सामाजिक विकास झाला.

५) जिल्हा उद्योग केंद्रामुळे सुशिक्षित बेरोजगार युवकांबरोबर इतरांनाही रोजगार मिळाला.

संशोधनाचे महत्त्व :-

भारतातील व पर्यायाने महाराष्ट्रामध्ये युवकांमध्ये बेरोजगारीची समस्या ही मोठ्या प्रमाणात दिसून येते. शासन ही समस्या कमी करण्याच्या उद्देशाने आवश्यक उपाययोजना करण्याचा प्रयत्न करीत आहे. यासाठी मूलभूत अर्थाने शिक्षणाच्या परंपरागत पद्धतीतील बदलांपासून ते रोजगार संधीची उपलब्धता शासन करत आहे. वेगवेगळ्या योजना व कार्यक्रम राबवत शासन बेरोजगारीच्या समस्येवर उपाय शोधत आहे. त्यातील एक उपाय म्हणजे शासनामार्फत प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी उद्योग केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. शिक्षणातून केवळ नोकरी न मिळवता रोजगाराची म्हणजे व्यवसाय/उद्योग उभा केला जाऊ शकतो व त्यासाठी आवश्यक ती मदत उद्योग केंद्राच्या माध्यमातून करण्यात येते. त्याच पद्धतीने सुशिक्षित बेरोजगारांना नोकरीशिवाय वेगवेगळ्या उद्योगाच्या स्थापनेतून आर्थिक विकास साधता येईल. यासाठी प्रस्तुत संशोधन विषयाचा अभ्यास करण्यात येत आहे. प्रस्तुत संशोधनात उद्योग स्थापण्यात उद्योग केंद्राची भूमिका अभ्यासण्यात येणार आहे. त्याचबरोबर सुशिक्षित बेरोजगारांना उद्योगाच्या माध्यमातून आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक विकास साधण्यासाठी कशा पद्धतीची मदत होते याचाही अभ्यास केला जाणार आहे.

प्रस्तुत संशोधनात देशातील व महाराष्ट्रातील बेरोजगारी सारख्या गंभीर प्रश्नाचा अभ्यास करण्यात येणार आहे. त्याचबरोबर बेरोजगार युवकांनी वेगवेगळ्या प्रेरणा घेऊन उद्योगाची स्थापना केल्यास त्यांच्या कौटुंबिक विकासाबरोबरच आर्थिक, सामाजिक विकास साधण्यासाठी उद्योग सहाय्यक ठरत आहेत. त्यामुळे सदर विषयाच्या अभ्यासामुळे एकंदर लातूर जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगाराच्या जीवनाचा अभ्यास केला जाणार असल्यामुळे प्रस्तुत विषयाच्या अभ्यासाला महत्त्व आहे.

संशोधन आराखडा :-

प्रस्तुत विषय अभ्यासण्यासाठी अन्वेषणात्मक संशोधन आराखड्याची मदत घेण्यात येईल. प्रस्तुत संशोधन विषय समस्या व योगदान या स्वरूपात आहे. संशोधन प्रश्नाच्या अनुषंगाने व संशोधन उद्दिष्ट्ये क्रमांकानुसार समस्यांच्या कारणांचा अभ्यास करावयाचा असल्यामुळे व समस्यांचे निदान करणे गरजेचे आहे व उपायही सुचविणे आवश्यक आहे म्हणून या संशोधनासाठी समग्र संशोधन आराखड्यापैकी अन्वेषणात्मक संशोधन आराखड्याचा वापर करण्यात येणार आहे.

संशोधन क्षेत्र :-

लातूर जिल्ह्यातील जिल्हा लघु उद्योग केंद्राकडुन अनुदान, कर्ज घेतलेल्या सुशिक्षित बेरोजगार युवकाचे समाजशास्त्रीय अध्ययन हा विषय ‘‘सामाजिक विद्याशाखा संकुल स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड’’ या शाखेतून अभ्यासण्यात येणार आहे. संशोधकाने संशोधन करत असताना अंतर्गत दृष्टीकोन अवलंब करुन संशोधन विषयाचे अभ्यास क्षेत्र म्हणून लातूर जिल्हा या क्षेत्राची निवड केली आहे. याचे कारण म्हणजे लातूर जिल्हा हा विविध कृषी आधारित व इतर उद्योगाच्या संदर्भाने दुसऱ्या स्थानावरचे क्षेत्र म्हणून ओळखले जाते. लातूर जिल्ह्यामध्ये कोणत्या प्रकारचे व्यवसाय चालतात व उद्योजकीयक्षेत्रातून लातूर जिल्ह्याच्या विकासातील भूमिका कोणती आहे ते संशोधीत करणे आवश्यक होते. त्याच बरोबर लातूर जिल्ह्यामध्ये सामाजिक स्थितीत लघु उद्योगामुळे नेमके कोणते परिवर्तन होत आहे याचा अभ्यास करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने संशोधनाचे क्षेत्र म्हणून लातूर जिल्ह्याची निवड केली आहे.

संशोधन विषयाची मर्यादा व व्याप्ती :-

प्रस्तुत संशोधन विषय हा लातूर जिल्ह्यापुरतेच मर्यादित आहे. त्याचे कार्यक्षेत्र लातूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यांपुरतेच मर्यादित असेल. तसेच त्याची व्याप्ती सुशिक्षित बेरोजगार युवकांच्या समस्या सोडवण्यासाठी उद्योग केंद्राची भूमिका यापुरती मर्यादित आहे.

नमुना निवडः-

प्रस्तुत संशोधन अध्ययनाची व्यापकता लक्षात घेऊन संशोधन कमी वेळेत वस्तुनिष्ठ होण्यासाठी संशोधन विश्वाचा विचार करता लातूर जिल्हा उद्योग केंद्राच्या अंतर्गत संशोधन विश्वाची संख्या २२८३ इतकी आहे. इतक्या लघु उद्योगजकांपर्यंत पोहोचण्यासाठी वेळ, श्रम आणि पैसा यांची मर्यादा पडते. त्याचबरोबर प्रत्येक उद्योजकाकडून सर्वच माहिती मिळेल असे निश्चित सांगता येत नाही. यासाठी समग्रातून १० टक्के या प्रमाणात नमुने निवडून संशोधन कार्य पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. तसेच उद्योग केंद्राचे अधिकारी व कर्मचारी यांचीही मदत घेण्यात येईल. यासाठी समग्राचे प्रतिनिधित्व करतील अशी नमुना संख्या निवडण्यात येईल ती पुढीलप्रमाणे

नमुना संख्या

अ.क्र.	लघुउद्योजक सुशिक्षित बेरोजगार	जिल्हा उद्योग अधिकारी / कर्मचारी	बँक अधिकारी	एकूण
१	२७०	१०	२०	३००

संशोधन पद्धती :-

प्रस्तुत संशोधन विषय हा योगदान व समस्या या स्वरूपात असल्यामुळे प्रस्तुत संशोधन विषयाचा व्यावहारिक उपयोग लक्षात घेता संख्यात्मक व गुणात्मक अशा स्वरूपात अभ्यास केला जाणार आहे. त्याचबरोबर जिल्ह्यातील वेगवेगळया तालुक्यातील उद्योजकीय विकासाच्या संदर्भात वेगवेगळ्या तालुक्यातील उद्योगांच्या स्थितीचा संघर्षात्मक व विकासात्मक दृष्टिकोनातून असलेल्या स्थितीचा तुलनात्मक अभ्यास करण्यात येणार आहे. तसेच संशोधन विषयाला अनुसरून बहुआयामी सिद्धांताचा वापर करण्यात येणार आहे. उदा.कार्यात्मक सिद्धांत, संघर्षात्मक सिद्धांत.

तथ्य संकलन

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम तथ्य संकलन या दोन्ही तंत्राचा अवलंब करण्यात येणार आहे.

१) प्राथमिक तथ्य संकलन

यात मुलाखत अनुसूची व निरीक्षण या तंत्राचा अवलंब करण्यात येईल.

२) दुय्यम तथ्य संकलन

यामध्ये संदर्भ ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे, शासकीय अहवाल, कागदपत्र इ. साधने वापरण्यात येतील. प्रस्तुत संशोधन आराखडा हा स्थूल स्वरूपाचा आहे. यात प्रत्यक्ष संशोधनाच्या वेळेत बदल करण्यात येतील.

प्रकरण मांडणी

प्रकरण -१

<u>विषय प्रवेश</u>

प्रस्तुत प्रकरणात लघू उद्योगाच्या संदर्भात संकल्पनात्मक आढावा घेण्यात येणार आहे. यामध्ये उद्योग म्हणजे काय? लघु उद्योगाची व्याख्या, गुंतवणूकीच्या आधारे उद्योगाचे प्रकार, लघू उद्योग, लघू उद्योगाची संकल्पना, व्याख्या, १९७० ते २०११ पर्यंत लघू उद्योगातील गुंतवणूक, लघू उद्योगातील स्थिर भांडवल, महाराष्ट्रातील लघुउद्योगाची संख्या इत्यादींचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण -२

<u>संशोधन पद्धती व संबंधित साहित्याचा आढावा</u>

प्रस्तुत प्रकरणात संशोधन कार्यासाठी वापरण्यात येणाऱ्या संशोधन पद्धती व संबंधित विषयात या अगोदर झालेल्या संशोधन साहित्याचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण ३ रे

<u>लघू उद्योगाची ऐतिहासिक पार्श्वभूमी</u>

या प्रकरणात भारतीय उद्योगाची ऐतिहासिक पार्श्वभूमी, पंचवार्षिक योजना काळात करण्यात आलेला खर्च, भारतातील लघू उद्योगाची संख्या व रोजगार संधी, भारतीय अर्थव्यवस्थेतील लघू उद्योगाची भूमिका, औद्योगिक धोरण, पंचवार्षिक योजना काळात लघूउद्योग क्षेत्रविषयक धोरण, उद्योजकाची व्याख्या, गुणवैशिष्ट्ये, कार्य, उद्योजकतेचा अर्थ, व्याख्या, स्वरूप, उद्योजकतेसाठी आवश्यक घटक, सुशिक्षित बेरोजगारीची व्याख्या, बेकारीचे

अनुमान, योजना आयोगानुसार बेरोजगाराची स्थिती, भारतातील सुशिक्षित बेरोजगार लोकांची संख्या, भारतातील बेरोजगारीचे प्रकार, कारणे, परिणाम, उपाय इत्यादीचा अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण -४

लघू उद्योग व लातूर जिल्हा

प्रस्तुत प्रकरणात लातूर जिल्ह्याची स्थूल माहिती देण्यात येईल. यात लातूर जिल्ह्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी, प्राकृतिक स्थान, रचना, क्षेत्रफळ, मृदा, नदीप्रणाली, वनसंपदा, खनिज संपदा, लोकसंख्या, साक्षरता, आरोग्य सुविधा, कृषी व जलसिंचन क्षेत्र, औद्योगिक व्यवस्था, बाजारपेठा, शिक्षण, पर्यटन इ. विषयी माहिती देण्यात येईल. तसेच लातूर जिल्ह्यातील लघू उद्योगाचा इतिहास, सद्यस्थिती यांचा अभ्यास करण्यात येईल. तसेच प्रस्तुत प्रकरणात लातूर जिल्हा उद्योग केंद्राची माहिती देण्यात येणार आहे. जिल्हा उद्योग केंद्राची उद्दिष्ट्ये, कार्य, उद्योगधंद्याचे जिल्ह्याच्या विकासावर होणारे परिणाम, लातूर जिल्ह्यातील उद्योगासाठी पंचवार्षिक योजनाकाळात झालेला खर्च, जिल्हा उद्योग केंद्राच्या अंतर्गत राबवण्यात आलेल्या योजना, लातूर जिल्ह्यातील एकूण लघु उद्योग इत्यादी घटकांचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण -५

जिल्हा उद्योग केंद्रामुळे सुशिक्षित बेरोजगारांच्या जीवनातील बदल

लातूर जिल्ह्यातील जिल्हा उद्योग केंद्राच्या अंतर्गत सुशिक्षित बेरोजगार लघु उद्योजकांच्या जीवनात झालेल्या सामाजिक, आर्थिक बदलाचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात करण्यात येईल.

प्रकरण -६

माहितीचे सांख्यिकीय विश्लेषण व अर्थनिर्वचन

प्रस्तुत प्रकरणात लातूर जिल्ह्यातून निवडण्यात आलेल्या लघु उद्योजकांच्या मुलाखतीच्या आधारे प्राप्त माहितीच्या आधारे आकडेवारीचे अर्थनिर्वचन केले जाईल.

प्रकरण -७

निष्कर्ष आणि शिफारशी

प्रस्तुत प्रकरणात मुलाखत अनुसूचीच्या माध्यमातून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे निष्कर्षाची मांडणी करण्यात येणार आहे. निष्कर्षाला अनुसरून उद्योजक व शासनासाठी आवश्यक शिफारशी मांडण्यात येणार आहे.

संदर्भ :

१) डॉ.प्रभाकर देशमुख (जून २००२), उद्योजकता विकास संकल्पना आणि व्यवहार, पिंपळापूरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, पृ.क्र.२

२) विलास आहेर (एप्रिल २०१४), व्यवस्थापक संपादक, उद्योजक मासिक, पृ.क्र.३

३) www.diclatur.com

४) डॉ.सुखदेव खंदारे (जून २०१३), भारतीय अर्थव्यवस्था, एज्यूकेशनल पब्लिशर्स

संशोधक — **पाटील सुलक्षणा भारत**

मार्गदर्शक — **प्रा.डॉ.काबळे बी.एम.**